# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0416 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2023 01:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 19/10/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/10/2023
**Time From (वेळेपासून):** 16:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/10/2023 **Time (वेळ):** 00:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/10/2023 00:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहायक संचालक,स्थानिक निधी लेखा परिक्षण , कार्यालय परभणी ,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अल्ताफ खान अजीजखान पठाण

**(b) Father's/Husband's Name (वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फुले नगर, सेलू,सेलू,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फुले नगर, सेलू,सेलू,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860165459

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष विठ्ठलराव साबळे | | | 1. लिपीक, सहायक संचालक स्थानिक,निधी लेखा परिक्षण कार्यालय ,राम नगर, परभणी, परभणी,मोंधा,परभणी,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/- रुपये दराच्या 8 चलनी | 4,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेसट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | U.DB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

दिनांक 19/10/2023

मी अल्ताफ खान अजीजखान पठाण, वय 48 वर्ष, व्यवसाय मजरी, रा फुले नगर, सेलू, ता. सेलु जि. परभणी. मो. क्र. 986016[illegible]459.

मी आज रोजी फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मजुरी करून कुटूंबाची उपजिविका भागवतो. माझी आई मसरत बी बाशिरखान पठाण ही सेलू नगर पालीकेमध्ये कामाठी म्हणून नोकरीला होती. ती बालवाडी सेविका या पदावर असताना दि. 14/01/2017 रोजी मयत झाली आहे. माझे आईचे मृत्यूपश्चात सेवाविषयक लाभ मिळण्यासाठी दिनांक 11/10/2023 रोजी सेवा पुस्तीकेची पडताळणी करून मिळण्यासाठी सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे गेलो व सेवापुस्तीका जमा केली.
त्यानंतर दि. 18/10/2023 रोजी मी माझे कामाचे काय झाले हे विचारण्यासाठी सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे जावून लिपीक संतोष साखरे यांची भेट घेतली असता साखरे हे मला बुरकुले, लेखापरीक्षा अधिकारी यांचेकडे घेवून गेले. त्यावेळी बुरकुले हे मला म्हणाले की, तुमच्या आईच्या सेवा पुस्तीकेमध्ये भरपूर त्रुटी आहेत. त्या त्रुटी पुर्ण करून तुम्हाला तात्काळ काम करून घ्यायचे असेल तर मला 5000/- रू. व साखरे यांना 1000/- रू. दयावे लागतील. साखरे यांनीही मला बुरकुले यांच्यासारखी लाचेची मागणी केल्याने त्यावेळी मी माझ्याकडे रक्कम नाही, माझे मालका कडुन आणतो असे म्हणुन बाहेर आलो. मला बुरकुले व लिपीक साखरे हे मागत असलेली रक्कम 6000/- रू. ही लाच असल्याने लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज दि. 19/10/2023 रोजी सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे जावून बुरकुले, लेखापरीक्षा अधिकारी आणि साखरे, लिपीक यांना भेटून माझे काम करण्याची विनंती करणार आहे. त्यावेळी त्या दोघांनी किंवा त्यांचे पैकी कोणी स्वतः अगर इतरा मार्फत माझे कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार दिली आहे.

त्यावरून पोलीस उपअधीक्षक श्री. अशोक इप्पर, एसीबी परभणी यांनी तात्काळ 1) श्री अजमत खान जब्बारखान पठाण, आरेखक व 2) श्री मुकूंद हरिभाउ डाके, कनिष्ठ लिपीक दोन्ही नेमणूक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. सापळा अधिकारी यांनी दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन केली. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचांनी माझी हस्तलिखीत तक्रार वाचून सदर तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर प्राथमिक कार्यवाहीला सुरुवात करण्यात आली. आम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून दोन्ही पंच समक्ष सापळा अधिकारी श्री इप्पर साहेब आणि माझे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहायाने रेकॉर्ड केले. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 अजमत खान जब्बारखान पठाण असे व्हाईस रेकॉर्डरसह बुरकुले व साखरे, लिपीक यांची भेट घेण्यासाठी पंच अजमत खान जब्बारखान पठाण यांचे मोटारसायकलने सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे गेलो. त्यावेळी कार्यालयामध्ये बुरकूले हे हजर नव्हते त्यामुळे कार्यालयामध्ये हजर असलेले लिपीक साखरे यांची भेट घेतली व बुरकुले साहेब कोठे आहेत या विषयी चौकशी केली असता बुरकूले साहेब रजेवर असल्याचे साखरे यांनी मला सांगितले. त्या भेटी दरम्यान माझी व साखरे यांची माझे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी साखरे यांनी माझे आईच्या सेवापुस्तीकेतील त्रुटींची पुर्तता करून

देण्याकरीता सुरूवातीला बुरकुले यांचेसाठी 5000/- रूपये आणि स्वतःसाठी 1000/- रूपये अशी 6000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोड अंती बुरकुले यांचेसाठी 3000/- रूपये आणि स्वतःसाठी 1000/- रूपये अशी 4000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

दि. 19/10/2023 रोजीच पडताळणी दरम्यान माझे व लिपीक साखरे यांचे दरम्यान पंच क्र. 1 अजमत खान जब्बारखान पठाण यांचे समक्ष झालेले संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड झाले आहे. सदरचे सर्व संभाषण पंच क्र. 2 डाके व सापळा पथकातील अधिका-यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे ऐकले आहे.

पडताळणी कार्यवाही दरम्यान साखरे यांनी माझे सोबत असलेल्या पंच क्र. 1 अजमत खान जब्बारखान पठाण यांचे विषयी चौकशी केल्याने सापळा कार्यवाहीसाठी पंच क्र 2 श्री मुकूंद डाके यांना माझे सोबत पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान उपअधीक्षक श्री. इप्पर साहेब यांनी मला, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच अॅंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म आणि वापरा बाबत माहिती दिली. त्याबाबत पोह/रविंद्र भुमकर यांचे करवी प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या 4,000/- रूपयांना ( ज्यामध्ये 500/- रू दराच्या आठ चलनी नोटा) पोह/रविंद्र भुमकर यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावून लिपीक साखरे, सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी यांना देण्यासाठी माझे अंगावरील पॅन्टच्या डाव्या बाजुच्या साइड पॉकेटमध्ये व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 2 मुकूंद हरिभाउ डाके असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी कार्यालय येथून पंच मुकूंद डाके यांचे मोटारसायकलने लिपीक संतोष साखरे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक मोटारसायकलने निघाले. मी व पंच क्र. 2 डाके असे शिवाजी नगर, परभणी येथील सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण परभणी कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील कार्यालयामध्ये पोहचलो. सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजूला आमचेवर लक्ष ठेवून थांबले.

मी व पंच डाके यांनी सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे साखरे यांची भेट घेतली. त्यावेळी मी माझे कामाचा विषय काढला असता साखरे यांनी लाचेची मागणी केल्याने मी पंच डाके यांचे समक्ष 4,000/- रू लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशातुन काढून साखरे यांचे समक्ष धरली परंतू साखरे यांनी सदर रक्कम हातामध्ये न घेता त्यांचे समोर असलेल्या फाईलमध्ये ठेवण्यास हाताने इशारा करून सांगितले व साहेब उद्या येतील साहेबांना भेटा असे म्हणाले. त्यामुळे मी लाचेची रक्कम फाईलमध्ये न ठेवता माझे पॅन्टचे डाव्या खिशामध्ये पुर्वीप्रमाणे ठेवून तसाच पंच डाके यांचेसह कार्यालयाचे बाहेर आलो. त्यावेळी पोह/निलपत्रेवार यांनी मला बाजुच्या पडीक इमारतीच्या कोप-यामध्ये नेवून माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. कार्यालयामध्ये घडलेला प्रकार सापळा पथकातील अधिकारी यांना सांगितला असता साखरे सांगतील तसे करा असे सापळा पथकातील अधिका-यांनी मला सांगितले व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालु करून माझेकडे देण्यात आला. त्यानंतर मी व पंच डाके असे दोघेही पुन्हा साखरे यांचे कडे गेलो पंच हे बाजुच्या टेबलवर चौकशीचा बहाना करून माझेवर लक्ष ठेवून थांबले. मी साखरे यांना तुम्ही हे साहेबांना देता का असे म्हणालो त्यावेळी सुध्दा साखरे यांनी मला हाताने इशारा करून लाचेची रक्कम त्यांचे समोर असलेल्या फाईलमध्ये ठेवण्यास सुचविले. त्यावर मी फाईलमध्ये ठेवू का असे म्हणून लाचेची रक्कम माझे पॅन्टचे डाव्या खिशामधून डाव्या हाताने काढून साखरे यांचे समोरील फाईलमध्ये ठेवली आणि कार्यालयाचे बाहेर येवून माझे जवळील कॅरीबॅगमधून रूमाल बाहेर काढून स्वतः चे गळया भोवती गुंडाळून पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ कार्यालयात आला आणि सापळा पथकाने साखरे, लिपीक यांना ताब्यात घेतले व 16.35 वा. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री इप्पर साहेबांनी साखरे यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव संतोष विठ्ठलराव साखरे, वय 39 वर्ष व्यवसाय नोकरी लिपीक, सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी रा. राम नगर, परभणी असे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली व लाचेची रक्कम कोठे आहे असे साखरे यांना विचारले असता त्यांनी मी लाचेच्या रक्कमेस हात लावला नाही, रक्कम कोठे आहे मला माहित नाही असा पवित्रा घेतला त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व पंच यांनी साखरे यांना सर्व घटनाक्रम रेकॉर्डींग झाले आहे असे सांगितले असता साखरे यांनी कपाटावर लाचेची रक्कम ठेवलेली फाईल काढून दिली. फाईलमध्ये ठेवलेली अॅन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम 4000/- रूपयांच्या नोटांवर आणि फाईलमध्ये नोटा ठेवलेल्या ठिकाणी अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर सापळा अधिकारी यांचे सुचनेनुसार पंच डाके यांनी त्या नोटा स्वतःकडे घेतल्या. त्यानंतर पंच क्र 1 अजमत खान यांचे कडे सापळा पुर्व कार्यवाही दरम्यान दिलेल्या नोटांचे नंबरचा कागदावरील नोटांचे नंबर व लाचरक्कम यांची पडताळणी करुन ती लाचेची रक्कम असल्याची खात्री केली आहे.

आज दि. 19/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे मी दिलेल्या तक्रारीवरून आज रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक संतोष विठ्ठलराव साखरे, वय 39 वर्ष व्यवसाय नोकरी लिपीक, सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी रा. राम नगर, परभणी यांनी माझे आईच्या सेवापुरत्तीकेतील त्रुटींची पूर्तता करून देण्याकरीता पंचासमक्ष 4000/- रूपये लाचेची मागणी करून 16.35 वा. सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय परभणी येथे स्विकारली आहे. म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता फिर्याद देत आहे.
माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. मी ती वाचून पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

subhash lachamanna anmulwar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** subhash lachamann
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अंमलदार
नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी